Website – mu.ac.in
Email id - dr.aams@fort.mu.ac.in
aams1@mu.ac.in

Academic Authorities,
Meetings &Services (AAMS)
Room No. 130, M. G. Road, Fort,
Mumbai – 400 032.
Tel. 022-68320033

Re- accredited with A ++ Grade (CGPA 3.65) by NAAC
Category- I University Status awarded by UGC

---

संदर्भ क्र.वि.प्रा.से.बै/ आयसीसी/ २०२४–२५/१३

# परिपत्रक:–

मुंबई विद्यापीठाच्या सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठ विभागाचे विभाग प्रमुख/संचालक यांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण २०२४/ई–९०५२२१ (परिपत्रक संलग्न) समन्वय दिनांक २० डिसेंबर, २०२४ नुसार राज्यातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांमधील विद्यार्थी–विद्यार्थीनीसाठी **वाचन संकल्प महाराष्ट्राचा** हा उपक्रम राबविणे बाबत सुचविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार आपल्या संस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीसाठी दिनांक १, जानेवारी, २०२५ ते १५ जानेवारी, २०२५ या कालावधीत वाचन पंधरवाडा हा उपक्रम राबविण्यात यावा सदर उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या आवडीच्या पुस्तकाचे अभिवाचन स्पर्धेचे आयोजन, विविध विषयांच्या लेखकांचा विद्यार्थ्यांशी संवाद इ. कार्यक्रमांचा समावेश करावा, ग्रंथप्रदर्शनामध्ये व्यक्तिमत्व विकास, सेल्फ हेल्प बुक्स, प्रेरणादायी ग्रंथ, चरित्र ग्रंथ, संदर्भ ग्रंथ व विविध पुरस्कार प्राप्त ग्रंथ व विविध विषयावरील ग्रंथाचा समावेश करावा व वाचन विषयक आवड निर्माण करणारे विविध नाविण्यपूर्वक उपक्रम राबवावेत. दिनांक १, जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. एकाच वेळी मुंबई विद्यापीठाशी सर्व संलग्नीत महाविद्यालयांतील आणि विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागातील सर्व विद्यार्थी किमान १ तास सामूहिक वाचन उपक्रमात सहभागी होतील या दृष्टीने नियोजन करावे सदर उपक्रमासाठी ग्रथालये/ज्ञान स्त्रोत क्रेंद्र व आवश्यकतेप्रमाणे वर्गखोल्यांचा वापर करावा. सदर उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांची संख्या गुंगल फॉर्म मध्ये भरावी

दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी विद्याठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालये व विद्यापीठातील परिसरात/प्रांगनात ग्रंथ दिंडीचे आयोजन करावे. परिपत्रकात नमूद केलेल्या सर्व उपक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थी सहभागी होण्याकरिता प्रोत्साहन द्यावे.

वरील सर्व उपक्रमा अंतर्गत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व निवडक (६) फोटो खालील ई मेल आयडी वर पाठवावेत (फोटोग्राफ झिफ फाईल मध्ये एकत्र पाठवावेत. schoolconnect@mu.ac.in तसेच फाईलला नाव देतांना कॉलेजचा नंबर व कॉलेजचे नाव याचा समावेश करावा.) सर्व उपक्रमांची आकडेवारी खालील गुगल फॉर्म मध्ये विद्यापीठास सादर करावी. https://forms.gle/MBAxe7uT3FKKRYPp6

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ

मुंबई – ४०० ०३२
दिनांक – ३१ डिसेंबर, २०२४

Website – mu.ac.in
Email id - dr.aams@fort.mu.ac.in
aams1@mu.ac.in

Academic Authorities,
Meetings &Services (AAMS)
Room No. 130, M. G. Road, Fort,
Mumbai – 400 032.
Tel. 022-68320033





**प्रति,**

प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठ विभागाचे विभाग प्रमुख/संचालक

**प्रत माहितीसाठी सादर :**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव. राजभवन, मुंबई — ३५.
२. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
३. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, ३, महापालीका मार्ग, मुंबई — ०१

**प्रत माहितीसाठी सादर :**

१. मा. कुलगुरु यांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट.
३. मा. कुलसचिव यांचे स्वीय सहायक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट.

**विद्यापीठे, महाविद्यालये व सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -२०२४/ ई - ९०५२२१/समन्वय**
मादाम कामा रोड, हुतात्मा चौक राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० डिसेंबर, २०२४.

**शासन परिपत्रक:**

वाचन संस्कृतीच्या विकासाने तरुणांच्या व्यक्तीमत्त्वाचे भरणपोषण होण्यास तसेच सामाजिक प्रबोधन होण्यास मदत होते. परंतु, अलीकडच्या काळात देशाचा तरुण वाचन संस्कृतीपासुन दुरावत चाललेला असल्याचे आढळून येते. त्यामुळे तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने या विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालय यांच्या माध्यमातून विद्यार्थी / विद्यार्थीनींची वाचन संस्कृती वाढविण्याकरिता उपक्रम राबवण्याची बाब विचाराधिन होती. त्याअनुषंगाने या विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालयामध्ये विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. सदर उपक्रमांतर्गत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

२. या विभागाच्या अधिपत्याखालील विद्यापीठे, महाविद्यालये, सार्वजनिक ग्रंथालय मध्ये विद्यार्थी / विद्यार्थीनींसाठी "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम राबविण्यात यावा. सदर उपक्रमांतर्गत दरवर्षी दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवाडा राबविण्यात यावा.

३. सदर उपक्रम राबविण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

१. **सामुहिक वाचन :** नवीन वर्षाची सुरुवात म्हणून १ जानेवारी, २०२५ रोजी या विभागाच्या अधिपत्याखालील सार्वजनिक ग्रंथालय, विद्यापीठे व महाविद्यालयांनी त्यांच्या सभागृहात/ प्रांगणात विद्यार्थ्यांच्या / ग्रंथालय सदस्यांच्या आवडीनुसार पुस्तकाचे वाचन करण्याचा सामुहिक उपक्रम राबवून त्याचे छायाचित्र विद्यापीठ/ महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावेत, तसेच त्यास स्थानिक वृत्तपत्रातून व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. सार्वजनिक ग्रंथालयांनी उपक्रमाचे छायाचित्र जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांना ई-मेलद्वारे पाठवावित. तसेच सर्व विद्यापीठांचे कुलगुरु/संचालकांनी या उपक्रमास समाज माध्यमांद्वारे आवश्यक प्रसिद्धी द्यावी. या उपक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना वाचावयाच्या पुस्तकाचे परीक्षण व पुस्तक कथन स्पर्धेविषयी माहिती द्यावी.

२. **वाचन कौशल्य कार्यशाळा :** निरंतर व सतत वाचनाची सवय लागावी यासाठी कोणती पुस्तके वाचावीत/ कशी वाचावीत याबाबत मार्गदर्शन करणारी वाचन कौशल्य विषयक कार्यशाळा प्रत्येक महाविद्यालयाने दिनांक १ जानेवारी रोजी आयोजित करावी. यावेळी वाचन कौशल्याविषयी मुलभूत संकल्पना विद्यार्थ्यांना समजून सांगाव्यात. पुस्तक परीक्षण व पुस्तक कथन स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांची नोंदणी करावी.

३. **वाचन संवाद :** स्थानिक लेखकांना महाविद्यालयात निमंत्रित करुन वाचक व लेखक परिसंवादाचे आयोजन करावे जेणेकरुन स्थानिक लेखक यांना प्रोत्साहन मिळेल व विद्यार्थ्यांना नवसाहित्याची ओळख होईल.

४. **पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा :** सदर स्पर्धा प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या महाविद्यालयाच्या स्तरावर राबविणे अनिवार्य आहे. या स्पर्धेसंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी. :-

- या स्पर्धेत सर्व विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल.
- प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आवडीच्या क्षेत्रातील पुस्तक निवडून संपूर्ण पुस्तकाचे सखोल वाचन करावे आणि आपल्या आकलनाप्रमाणे वाचलेल्या पुस्तकावर चिंतनात्मक व समीक्षणात्मक परिक्षण निबंध लिहून तो संयोजकाकडे सुर्पत करावा किंवा ठरलेल्या दिनांकास त्या निबंधाचे कथन करावे.
- प्रस्तुत परिक्षण निबंध किमान ५०० शब्दांचा असावा किंवा त्याचे ५ मिनिटे कथन करावे.
- वाचनासाठी विद्यार्थ्यांना कुठल्याही भाषेचे आणि कुठल्याही विषयाचे (साहित्यापासून ते तंत्रज्ञानापर्यत) पुस्तक निवडीचे स्वातंत्र असेल.
- निवडलेले पुस्तक हे प्रवेशित विद्यार्थ्याचे क्रमिक अभ्यासक्रमा व्यतिरिक्त असावे.
- पुस्तकाची निवड करण्यासंदर्भात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सहकार्य/मार्गदर्शन करावे.
- वाचनीय पुस्तकाची यादी सूचना फलकावर दर्शनी भागात लावावी.
- महाविद्यालयाने /सार्वजनिक ग्रंथालयाने विद्यार्थ्यांची मागणी व पुस्तकांच्या उपलब्धतेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करुन द्यावीत.
- सदर स्पर्धेचे आयोजन करुन परिक्षकांकडून ३ उत्कृष्ट परिक्षण निबंधाची / कथनाची निवड करण्यात यावी आणि त्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र/बक्षीस महाविद्यालयाकडून देण्यात यावीत.
- स्पर्धेतील विजेत्या परिक्षण निबंधाचा समावेश महाविद्यालयाच्या वार्षिक अंकामध्ये करावा.

४. वाचन पंधरवडानिमित्त आयोजन करावयाच्या उपक्रमांसाठी विविध समित्यांची रचना पुढीलप्रमाणे असेल :

- **राज्यस्तरीय समिती :** सदर समितीमध्ये संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण/ ग्रंथालय महाराष्ट्र राज्य तसेच संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा समावेश असेल.
- **विभागस्तरीय समिती :** सह संचालक, उच्च शिक्षण /तंत्र शिक्षण, सहाय्यक संचालक, ग्रंथालय, संचालक, विद्यार्थी कल्याण, संबंधित विद्यापीठ, संचालक, ज्ञानस्रोत केंद्र,

संबंधित विद्यापीठ, समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, संबंधित विद्यापीठ यांचा समावेश असेल.

- **जिल्हास्तरीय समिती :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी संबंधित जिल्हा, प्राचार्य, संबंधित जिल्हयातील प्रमुख महाविद्यालय, जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, ग्रंथपाल, जिल्हयातील प्रमुख सार्वजनिक ग्रंथालये, जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी यांचा समावेश असेल.
- **महाविद्यालयीन समिती :** महाविद्यालयाचे प्राचार्य, महाविद्यालयाचे ग्रंथपाल, महाविद्यालयातील भाषा शिक्षक (प्रत्येक भाषेचा एक), राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी यांचा समावेश असेल.

५. वाचन पंधरवडानिमित्त सार्वजनिक ग्रंथालये व महाविद्यालयांनी शक्य झाल्यास पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करावे. तसेच सार्वजनिक ग्रंथालयांनी या कालावधीत अधिकाधिक विद्यार्थ्यांची सभासद नोंदणी करण्याचा प्रयत्न करावा. "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम राबविण्याकरिता कार्यक्रमाचे वेळापत्रक हे या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विविरणपत्राप्रमाणे असेल.

६. "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम प्रत्येक वर्षी दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत राबविण्यात यावा. या उपक्रमाची सुरूवात १ जानेवारी २०२५ पासून करावी.

७. विद्यार्थी/ विद्यार्थीनींमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी/ वाढवण्यासाठी या उपक्रमातील उपरोक्त बाबी या मार्गदर्शक स्वरुपाच्या असून, संबंधित विद्यापीठे/ महाविद्यालये/ सार्वजनिक ग्रंथालये याव्यतिरिक्त अन्य अभिनव उपक्रम राबवू शकतात.

८. हा शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४१२२०१८३४४४९२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VISHAL VITTHAL TATHE

Digitally signed by VISHAL VITTHAL TATHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=eeff9ebf91fcd1b67af691f7a996da74cb0b83c8e63f6d823c62c4a3fdfd1e63,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C76494BBBFFB57A5F3FF9C36D4D040B275AF317740927F008AD60DCF9E012FF3, cn=VISHAL VITTHAL TATHE
Date: 2024.12.20 18:38:55 +05'30'

**(विशाल वि. ताठे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, मुंबई.
२. मा. सभापती/ मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधामभवन, मुंबई.
३. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई.
४. सर्व सन्माननीय महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा सदस्य.
५. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

६. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा .मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१/२, मुंबई/ नागपूर.
११.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई .
१२.सर्व संचालक, उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण/ कला/ ग्रंथालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३.संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय (संबंधित संचालक यांच्यामार्फत).
१४.सह सचिव/ सर्व उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.कुलसचिव, सर्व अकृषी/ अभिमत व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे महाराष्ट्र राज्य.
१६.निवडनस्ती (आस्था-२)

शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -२०२४/ ई - ९०५२२१/समन्वय, दि. २० डिसेंबर, २०२४ सोबतचे विवरणपत्र.

**"वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम राबविण्यासाठीच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक**

| अ.क्र. | दिनांक | कार्यक्रमाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | २१ डिसेंबर, २०२४ | राज्य स्तरीय समिती व विभागीय समित्यांची ऑनलाईन बैठक. |
| २ | २३ डिसेंबर, २०२४ | जिल्हा समितीची ऑफलाईन बैठक (स्थानिक वृत्तपत्रातून/ समाज माध्यमांतून व्याप प्रसिद्धी करणे.) |
| ३ | २६ डिसेंबर, २०२४ | महाविद्यालयीन समितीचे ऑफलाईन बैठक (प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत संबंधित कार्यक्रमाची रुपरेषा सूचनाफलक/ एस. एम. एस./ संकेतस्थळ याच्या माध्यमातून पोहचविणे.) |
| ४ | २९ डिसेंबर, २०२४ | विद्यापीठे/ महाविद्यालय/ सार्वजनिक ग्रंथालय यांनी ग्रंथालयाची स्वच्छता करुन त्याचे छायाचित्र त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. |
| ५ | ३० व ३१ डिसेंबर, २०२४ | ग्रंथ प्रदर्शनींचे आयोजन महाविद्यालय तसेचा सार्वजनिक ग्रंथालयामध्ये करणे. |
| ६ | १ जानेवारी, २०२५ | विद्यापीठे/महाविद्यालय/ सार्वजनिक ग्रंथालयांनी वाच कौशल्य कार्यशाळा आयोजित करणे.<br><br>विद्यापीठे/महाविद्यालय/ सार्वजनिक ग्रंथालयांनी त्यांच्या सभागृहात/ प्रांगणात विद्यार्थी/ विद्यार्थीनींचे त्यांनी आवडीनुसार निवडलेल्या पुस्तकाचे सामुहिक वाचन करावे. |
| ७ | ३ ते ७ जानेवारी, २०२५ | महाविद्यालयांनी/ सार्वजनिक ग्रंथालयांनी लेखक व विद्यार्थी यांच्यामधील वाचन संवाद कार्यक्रमाचे आयोजन करावे. |
| ८ | १६ जानेवारी, २०२५ | महाविद्यालयांनी/ सार्वजनिक ग्रंथालयांनी पुस्तक परिक्षण व कथन स्पर्धेचे आयोजन करावे. |
| ९ | २६ जानेवारी, २०२५ | विजेत्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्र/बक्षीस देण्यात यावे. |

VISHAL
VITTHAL TATHE

Digitally signed by VISHAL VITTHAL TATHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=eeff9ebf91fcd1b67af691f7a996da74cb0b83c8e63f6d823c62c4a3fdfd1e63, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C76494BBBFFB57A5F3FF9C36D4D040B275AF317740927F008AD60DCF9E012FF3, cn=VISHAL VITTHAL TATHE
Date: 2024.12.20 18:39:19 +05'30'

**(विशाल वि ताठे)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**